दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३१७ वा • गुरुवार, ता. ४ सप्टेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## वीज सवलत घोटाळ्यात भाजपचा दुटप्पीपणा उघड

### तृणमूल काँग्रेसचा आरोप

**पणजी । रयत समाचार**



अखिल भारतीय तृणमूल काँग्रेस गोवाचे राष्ट्रीय प्रवक्ते ट्रोजन डी'मेलो यांनी पत्रकार परिषदेत वीज सवलत घोटाळ्यात भाजपच्या दुटप्पीपणाचा आरोप केला. त्यांनी सांगितले की, घोटाळ्यात संशयितांना संरक्षण देण्यात आले असून नागरिकांना माहिती असूनही आरोपींवर कारवाई झाली नाही. डी'मेलो यांनी आरोप केला की, वीज सवलत घोटाळ्यात मंत्री माविन गुदिन्हो यांची निर्दोष मुक्तता होऊन भाजप पक्षाचा दुटप्पीपणा उघड झाला आहे. त्यांनी सांगितले की, ''कायद्याने शिक्षा होण्याऐवजी घोटाळेबाजांना संरक्षण देण्यासाठी सरकार बाहेर पडले आहे.'' त्यांनी निकालाच्या काही महत्वाच्या मुद्द्यांकडेही लक्ष वेधले. परिच्छेद १२९ मध्ये असे नोंदवले आहे की ज्या साक्षीदारांची चौकशी व्हायला हवी होती, त्यांची चौकशी अभियोक्ता मंडळाने केली नाही. दिवंगत मनोहर पर्रिकर आणि तत्कालीन कार्यवाहक मुख्यमंत्री प्रतापसिंह राणे यांना साक्षीदार चौकटीत उभे करून चौकशी करण्यात आलेली नाही, ज्यामुळे महत्त्वाचे तथ्य लपवले गेले आणि खटला कमकुवत झाला. डी'मेलो यांनी पृष्ठ १७३, परिच्छेद १३९ व १४१ कडेही लक्ष वेधले. त्यांनी सांगितले की, दोन्ही आरोपी कंपन्यांनी मिळवलेली वीज सवलत परत केली गेली असून, तरीही आरोपींना मुक्त केले गेले. ''जर एखादा सामान्य व्यक्ती चोरी करताना पकडला आणि सामग्री परत केली, तर ती पुरावा बनते. पण या प्रकरणात कोट्यवधी रुपये परत मिळूनही आरोपी मुक्त झाले आहेत,'' असे त्यांनी स्पष्ट केले. डी'मेलो म्हणाले की, ''संपूर्ण निकालपत्र सांगते की भाजप सरकारने स्वतःचे वॉशिंग मशीन तयार ठेवलं, घोटाळेबाज ठेवले आणि त्यांना स्वच्छ घोषित केले. सदर मंत्री रडत आहेत की त्यांना २२ वर्षे त्रास सहन करावा लागला, हे पूर्णपणे खोटे आहे. त्यांच्या निर्दोषपणाचा पुरावा कुठेही नाही.'' त्यांनी स्पष्ट केले की, ''जरी आरोपींविरुद्ध संशय मजबूत आहे, तरी त्यांना दोषी ठरवण्यासाठी पुरावे अपुरे आहेत.'' डी'मेलोने मंत्र्यांना सवलत घोटाळ्यावर चर्चेसाठी खुले आव्हान दिले आहे.



## गणेशोत्सवाचा दिल्लीत जल्लोष

### रामदास आठवलेंची खास उपस्थिती

**नवी दिल्ली । रयत समाचार**

गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानंतर सांस्कृतिक कार्य विभागातर्फे महाराष्ट्रासह राज्याबाहेरील मराठीबहुल भागांत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन सुरू आहे. त्याच अनुषंगाने राजधानी नवी दिल्ली येथेही आकर्षक कार्यक्रमांनी गणेशोत्सवाचे वातावरण रंगून गेले आहे. गणपती कार्यक्रमास केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांची विशेष उपस्थित होती. १ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र सदन येथे नागपूरच्या सूर-संगम संस्थेच्या सचिन आणि सुरभी ठोंबर यांनी सादर केलेल्या संगीतमय कार्यक्रमाने उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यापूर्वी २७ ते २९ ऑगस्ट २०२५ दरम्यान सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे वन संशोधन केंद्र, डेहराडून येथेही सांस्कृतिक कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडले होते. महाराष्ट्र सदनातील हस्तकौशल्य दालनालाही दिल्लीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, विविध मान्यवरांनी 'श्रीं'च्या दर्शनासाठी हजेरी लावली. यामध्ये उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार व महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, माजी राज्यपाल रमेश बैस, राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम तसेच दिल्लीतील विविध राज्यांचे निवासी आयुक्त यांचा समावेश आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सदनात सुरू असलेल्या या उपक्रमांमुळे दिल्लीतील मराठी समाजासोबतच इतर राज्यांतील नागरिकांमध्येही महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ओळख नव्याने अधोरेखित होत आहे.

## गावागावातील प्रत्येक रस्त्याला मिळणार 'सांकेतिक क्रमांक'

**कोपरगाव । किसन पवार**

शेतकऱ्यांच्या हक्काचा व शिवारातील रस्त्यांवरील वाद कायमचा मिटवणारा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्यातील प्रत्येक गावातील सर्व रस्त्यांना आता विशिष्ट 'सांकेतिक क्रमांक' देण्यात येणार असून, त्यांचे सीमांकन करून महसुली नोंदीत समावेश केला जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी कायदेशीर व अडथळामुक्त मार्ग उपलब्ध होणार आहेत. २९ ऑगस्ट रोजी जारी करण्यात आलेल्या अध्यादेशानुसार जिल्हा, तालुका व गाव पातळीवर स्वतंत्र कोड दिले जातील. अहिल्यानगर जिल्ह्यास '५' असा क्रमांक निश्चित करण्यात आला असून, याच धर्तीवर सर्व जिल्ह्यांना सांकेतिक क्रमांक मिळणार आहेत. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्य शिवपानंद शेत रस्ते चळवळीच्या मागण्या मान्य करत हा निर्णय घेतल्याची माहिती राज्य समन्वयक दादासाहेब जंगले यांनी दिली. मूळ जमाबंदी (१८९०-१९३०) व एकत्रीकरण योजना नकाशांत असलेले शिवार रस्ते महसुली कागदपत्रांत अद्ययावत न झाल्याने शेतकरी दीर्घकाळ अडचणीत होते. वाद, अतिक्रमण यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांना आळा घालण्यासाठी रस्त्यांचे सीमांकन करून त्यांना अधिकृत क्रमांक देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारच्या सूचनेनुसार ग्रामसेवक, महसूल कर्मचारी, पोलीस पाटील, कोतवाल आदींनी शिवार फेरी घेऊन रस्त्यांची यादी तयार करणे, अतिक्रमण हटवणे व ही सर्व माहिती गाव नमुना क्र. १ (फ) मध्ये नोंदवणे बंधनकारक असेल. या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करत राज्य चळवळीचे प्रणेते शरद पवळे व समन्वयक दादासाहेब जंगले यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व महसूल विभागाचे अभिनंदन केले असून, ''लवकरात लवकर प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी,'' अशी मागणी केली आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे हे पाऊल राबविल्यास, शेतीमाल वाहतूक, यंत्रसामग्रीचा वापर व शेतांपर्यंत पोहोच अधिक सुलभ होणार आहे.

# नैसर्गिक आपत्तींमध्ये मोदी सरकारची गुन्हेगारी बेपर्वाई

### अखिल भारतीय किसान सभेची राष्ट्रीय आपत्ती जाहीर करण्याची मागणी

**नवी दिल्ली । रयत समाचार**

देशातील अनेक राज्ये अभूतपूर्व पूर, भूस्खलन आणि अनियमित पावसामुळे उध्वस्त झाली असताना केंद्रातील भाजपा सरकारने आपले घटनात्मक कर्तव्य पार पाडण्यात घोर दुर्लक्ष केले असल्याचा आरोप अखिल भारतीय किसान सभेने (एआयकेएस) केला आहे. सरकारची निष्क्रियता आणि जनविरोधी धोरणांचा तीव्र शब्दांत निषेध नोंदवित किसान सभेने तातडीने राष्ट्रीय आपत्ती जाहीर करण्याची मागणी केली आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य किसान सभेचे कॉम्रेड राजन क्षीरसागर यांनी दिली. देशभरात मोठे नुकसान शेकडो जीव गमावले, लाखो विस्थापित : पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, हरियाणा, राजस्थान, महाराष्ट्र, बिहारसह अनेक राज्ये नैसर्गिक आपत्तीने विद्ध्वस्त झाली आहेत. शेकडो नागरिकांचा मृत्यू, लाखो लोकांचे विस्थापन आणि कोट्यवधींची शेती, घरे व संसार उद्ध्वस्त झाले. तरीसुद्धा केंद्र सरकारने या संकटाला राष्ट्रीय आपत्ती घोषित करण्यास नकार दिल्याने किसान सभेने संताप व्यक्त केला आहे. आपत्ती व्यवस्थापन कायद्यातील दुरुस्त्यांचा विरोध : अलीकडील आपत्ती व्यवस्थापन (दुरुस्ती) कायदा, २०२५ हा सत्तेचे धोकादायक केंद्रीकरण करणारा असून, राज्य सरकारे व स्थानिक स्वराज्य संस्थांना दुय्यम ठरवतो, असा आरोप सभेने केला. 'नुकसानभरपाई' या ऐवजी 'मदत' हा शब्द वापरून केंद्र सरकारने आपले कायदेशीर दायित्व टाळले असल्याचेही सभेचे म्हणणे आहे. नुकसानभरपाईसाठी नवीन मानदंडांची मागणी : किसान सभेने नुकसानग्रस्तांसाठी तातडीने वस्तुनिष्ठ नुकसानभरपाई जाहीर करण्याची मागणी केली आहे : प्रत्येक मृत व्यक्तीसाठी ₹२५ लाख भरपाई. पिकांच्या नुकसानीसाठी प्रति हेक्टर ₹५०,०००. शेती उपकरणे व बागायती नुकसानीसाठी संपूर्ण भरपाई. बटाईदार शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज. सर्व कृषी कर्जांची संपूर्ण माफी. विस्थापित कुटुंबांसाठी रोजगार हमी व नुकसानभरपाई. मागील आपत्तीग्रस्तांची वचने अद्याप अपूर्ण : इरशाळवाडी, वायनाड, जोशीमठ, धराली या आपत्तीग्रस्तांना जाहीर केलेले पुनर्वसन व मदत अद्याप न मिळाल्याचा मुद्दा सभेने उपस्थित केला. स्थानिक स्वराज्य संस्थांकडे दुर्लक्ष : पंचायत व स्थानिक संस्था आपत्तीग्रस्तांच्या गरजांचे मूल्यांकन करण्यास व पुनर्वसनासाठी सक्षम असतानाही केंद्र सरकार त्यांना प्रक्रियेपासून वंचित ठेवत असल्याचे सभेने सांगितले. अखिल भारतीय किसान सभेची केंद्र सरकारकडे मागणी :१. तातडीने राष्ट्रीय आपत्ती जाहीर करावी, २. आपत्ती व्यवस्थापन (दुरुस्ती) कायदा, २०२५ रद्द करावा, ३. बाधित राज्यांना पुरेशी मदत व संसाधने उपलब्ध करून द्यावीत, ४. नुकसानभरपाईचे मानदंड अद्ययावत करून कायदेशीर करावेत, ५. मागील आपत्तीग्रस्तांना जाहीर केलेल्या योजना पूर्ण कराव्यात,६. स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करून प्राथमिक प्रतिसादकर्ते मानावे. किसान सभेच्या मते, मोदी सरकारने नैसर्गिक आपत्तींचा राजकीय फायदा घेणे थांबवून सर्व नागरिकांचे संरक्षण करण्याचे घटनात्मक कर्तव्य पार पाडले पाहिजे. अन्यथा ही उदासीनता सरकारच्या जनविरोधी आणि कॉर्पोरेटपुरस्कृत भूमिकेची पुष्टी करेल.







## हिंदुस्तान कोका कोला सोबत पुणे, पालघर, रत्नागिरी, जळगावचे करार

### मुख्यमंत्री फडणवीसांचा पुढाकार

**मुंबई । रयत समाचार**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे, पालघर, रत्नागिरी आणि जळगाव जिल्हा प्रशासनामार्फत हिंदुस्तान कोका-कोला बेव्हरेजेस प्रा.लि. सोबत एकूण चार सामंजस्य करार (MoU) करण्यात आले.

या महत्त्वपूर्ण कराप्रसंगी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. या करारांमुळे जिल्ह्यांमध्ये शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन आणि औद्योगिक संधींना चालना मिळणार असून रोजगार निर्मिती व स्थानिक स्तरावर सुविधा उभारणीसही बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या करारांद्वारे राज्यात पायाभूत सुविधांच्या उभारणीत आणि शाश्वत विकासाच्या दिशेने नवे पर्व सुरू होणार असल्याचे मत या वेळी व्यक्त करण्यात आले.

**हिंदुस्तान कोका-कोला बेव्हरेजेस प्रा.लि. (HCCB)** ही द कोका-कोला कंपनीची भारतातील प्रमुख बाटलीबंद पेय उत्पादक कंपनी आहे. ही कंपनी खालील प्रमुख शीतपेये व पॅकेज्ड ड्रिंक्स तयार करते : १) कार्बोनेटेड शीतपेये (Soft Drinks) Coca-Cola,Thums Up, Sprite, Fanta, Limca २) फळांवर आधारित पेये (Fruit-based Drinks) Maaza (आंबा पेय), Minute Maid (फळांचा ज्यूस संत्रा, मिक्स्ड फ्रूट इ.) ३) पॅकेज्ड पाणी Kinley (बॉटल्ड वॉटर), ४) स्पार्कलिंग व फ्लेवर्ड ड्रिंक्स Kinley Soda Smartwater (प्रीमियम पॅकेज्ड वॉटर) HCCB ही भारतातील सर्वात मोठ्या FMCG कंपन्यांपैकी एक असून ती देशभरात अनेक उत्पादन प्रकल्प चालवते. याशिवाय कंपनी टिकाऊपणा (Sustainability), पर्यावरण संवर्धन, जलसंधारण व पुनर्वापर या क्षेत्रांमध्येही उपक्रम राबवते.

ही मूळ अमेरिकन कंपनी आहे.

## १८ वर्षांनंतर 'डॅडी' मोकळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

**मुंबई । रयत समाचार**



दगडी चाळीचा बॉस आणि माजी आमदार म्हणून परिचित असलेले अरुण गवळी यांना अखेर १८ वर्षांनंतर तुरुंगातून सुटका मिळाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने कमलाकर जामसंडेकर हत्याकांड प्रकरणात गवळी यांना सशर्त जामीन मंजूर केला असून, मंगळवारी (३ सप्टेंबर) नागपूर केंद्रीय कारागृहातून त्यांची सुटका करण्यात आली. २००७ साली झालेल्या या खुनाच्या प्रकरणात गवळी यांना आजीवन कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली होती. त्यानंतर गेली तब्बल १७ वर्षे ते तुरुंगातच होते. मात्र, सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने त्यांची तब्येत, वयोमान आणि खटल्याची पार्श्वभूमी लक्षात घेऊन जामीन मंजूर केला. गवळी यांच्या सुटकेमुळे दगडी चाळ परिसरात जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करून आणि घोषणाबाजी करत 'डॅडी'चे स्वागत केले. अरुण गवळी यांनी तुरुंगातून बाहेर पडताना माध्यमांशी थोडक्यात संवाद साधला. ''मी न्यायालयाचा आदर करतो आणि पुढील आयुष्यात कायद्याच्या चौकटीत राहून जगणार आहे,'' असे त्यांनी सांगितले. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान सरकारच्या वकिलांनी गवळी यांची पूर्वीची गुन्हेगारी पार्श्वभूमी न्यायालयासमोर मांडली होती. मात्र, न्यायालयाने शिक्षा भोगल्यानंतरचा कालावधी आणि आरोग्याचा विचार करून त्यांना दिलासा देण्याचा निर्णय घेतला. गवळी यांच्या सुटकेनंतर आता पुन्हा मुंबईच्या अंडरवर्ल्ड राजकारणावर आणि दगडी चाळीतील समीकरणांवर चर्चांना उधाण आले आहे. एकेकाळी दाऊद इब्राहिमला थेट टक्कर देणारा गवळी, तुरुंगवासानंतर कशा प्रकारे आपले पुढील आयुष्य घालवतो, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## अहिल्यानगर महानगरपालिकेच्या ४ घंटागाड्यांसह ७ ड्रायव्हर-हेल्पर चोरीला?

**अहिल्यानगर । रयत समाचार**

महानगरपालिकेसाठी कचरा उचलण्याचे काम अहमदाबाद (गुजरात) येथील श्रीजी एजन्सी या कंपनीकडे गेल्या काही वर्षांपासून ठेका आहे. श्रीजी एजन्सीच्या तब्बल २० लाख रूपये किंमतीच्या चार घंटागाड्या आणि त्या गाड्यांवर काम करणारे सात ड्रायव्हर व हेल्पर बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे. श्रीजी कंपनीत मॅनेजर म्हणून काम करणारे सतीश साहेबराव शिरसाठ (रा. बुरूडगाव रस्ता, जहागीरदार चाळ, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत दिली आहे. यात असे म्हटले आहे की, कंपनीने २०२३ मध्ये चार घंटागाड्या खरेदी केल्या होत्या. मात्र त्यांची नोंदणी आरटीओकडे अद्याप झालेली नव्हती. गेल्या १० महिन्यांपासून या गाड्यांवर मध्यप्रदेशातील ब्रिजेश सारेण, नुरा बारभोर, बबलु बारभोर, अरविंद अमलीयार, बुरा बारभोर, संजु मेढा व कमील कटारा हे सात इसम ड्रायव्हर व हेल्पर म्हणून काम करत होते. हे सर्वजण दररोज सकाळी सात वाजता काम सुरू करून सायंकाळी पाचच्या सुमारास गाड्या अहिल्यानगर-दौंड रस्त्यावरील सागर शिंदे यांच्या मोकळ्या जागेत पार्क करून तिथेच राहत होते. मात्र सोमवारी (१ सप्टेंबर) संध्याकाळी गाड्या पार्क केल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी गाड्या व ड्रायव्हर बेपत्ता झाल्याचे लक्षात आले. सुपरवायझर अक्षय निकम व सागर ढुमणे यांच्यासोबत शोध घेतला असता गाड्या व इसम कुठेही सापडले नाहीत. या प्रकरणी कोतवाली पोलीसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. सात संशयित आरोपींसह चार गाड्या बेपत्ता झाल्याने महानगरपालिकेच्या कचरा संकलनाच्या कामात अडथळा निर्माण झाला आहे.





### आयसीसी महिला विश्वचषक २०२५


## तब्बल १२२.५ कोटींची बक्षीस रक्कम

**मुंबई । रयत समाचार**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ साठीच्या बक्षीस रकमेची घोषणा केली असून, यंदा तब्बल १२२.५ कोटी रुपयांची एकूण रक्कम खेळाडूंमध्ये वाटली जाणार आहे. प्रत्येक संघाला सहभागी होण्यासाठी २.२० कोटी रुपये मिळणार आहेत. महिला क्रिकेटमध्ये हा आतापर्यंतचा सर्वात मोठा आर्थिक टप्पा मानला जात आहे. पुरुषांच्या क्रिकेटइतकाच महिलांच्या स्पर्धेलाही मानाचा तितकाच ताज मिळावा, यासाठी आयसीसीने ही पावले उचलल्याचे सांगण्यात येत आहे. क्रिकेट जाणकारांच्या मते, एवढ्या मोठ्या प्रमाणात बक्षीस रक्कम उपलब्ध झाल्याने महिला क्रिकेट अधिक आकर्षक होईल आणि खेळाडूंचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार आहे.

**बक्षीस रकमेचे वाटप –** विजेता संघाला ४० कोटी रुपये, उपविजेता संघाला २० कोटी रुपये, सेमीफायनलिस्ट संघाला प्रत्येकी ९.८८ कोटी रुपये, गट स्तरावरील प्रत्येक विजेत्या संघाला ३० लाख रुपये, पाचव्या आणि सहाव्या क्रमांकावर राहणाऱ्या संघांना प्रत्येकी ६ कोटी रुपये, सातव्या आणि आठव्या क्रमांकावर राहणाऱ्या संघांना प्रत्येकी २.४७ कोटी रुपये.

ICC WOMEN'S CRICKET WORLD CUP INDIA 2025




# अहिल्यानगर महापालिका निवडणूक २०२५
# १७ प्रभाग, ६८ जागांसाठी रंगणार तमाशा

**अहमदनगर । तुषार सोनवणे**

येथील महानगरपालिकेच्या २०२५ च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मध्ये ६८ जागांसाठी थेट सामना रंगणार आहे. एकूण १७ प्रभाग असून, यंदाच्या निवडणुकीत प्रत्येक प्रभागात ४-४ जागा निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे शहराच्या राजकारणात जुनाच राजकीय संघर्ष उभा राहणार आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महापालिकेची एकूण लोकसंख्या ३,४६,७५५ इतकी असून, त्यात ४४,९११ अनुसूचित जातींची (SC) लोकसंख्या आणि ३,८१३ अनुसूचित जमातींची (ST)लोकसंख्या नोंदवली गेली आहे. निवडणूक विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार शहरातील काही प्रभागांमध्ये SC-ST मतदारांची लक्षणीय ताकद असून, उमेदवारांची डोकेदुखी वाढवणारे हे समीकरण ठरणार आहे.

प्रभागनिहाय लोकसंख्या चित्र : प्रभाग क्र. ५ मध्ये ७८७३ SC मतदार असून हा सर्वाधिक प्रभावी प्रभाग ठरण्याची चिन्हे आहेत.

प्रभाग क्र. १७ मध्ये ४२९५ मतदार, प्रभाग क्र. १ मध्ये ३५६३, तर प्रभाग ८, ९ आणि १३ मध्ये ३५०० पेक्षा अधिक SC मतदार असल्याने या भागात आरक्षित जागांवर उमेदवारीचे समीकरण अधिक गुंतागुंतीचे होणार आहे. ST मतदारांचा विचार करता प्रभाग ७, १५ आणि १६ मध्ये तुलनेने जास्त म्हणजे ३५० ते ४१६ मतदार आहेत. महापालिकेच्या एकूण १७ प्रभागांतून येणाऱ्या ६८ नगरसेवकांच्या निवडणुकीसाठी सर्व राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी सुरू केली असून, आरक्षित जागा, लोकसंख्येचे प्रमाण आणि स्थानिक पातळीवरील समीकरणे पाहता यंदाची निवडणूक अत्यंत रंगतदार ठरणार आहे. अहिल्यानगरकरांची उत्सुकता आता जाहीर होणाऱ्या प्रभाग आरक्षणाच्या यादीकडे लागली आहे. कारण त्यावरच अनेक नेते-कार्यकर्त्यांचे राजकीय भविष्य अवलंबून आहे.



**अहमदनगर शहरातील माळीवाडा येथील विशाल गणपती मंदिरात विराजमान असलेले गणपती बप्पा .**

**फोटो सौजन्य - नगरी स्टोरीज**

# संरक्षण खात्याच्या बनावट एनओसी प्रकरणातील मूळ फाईल गहाळ

## तोफखाना पोलिसांत गुन्हा दाखल

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महापालिकेच्या नगररचना विभागातील एका महत्त्वाच्या संचिकेची (फाईल) चोरी झाल्याच्या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सावेडी उपनगरातील बांधकाम परवानगीसाठी सय्यद फैय्याज हाजीमिर अजोमिद्दीन जाहागीरदार यांनी सादर केलेल्या बनावट ना हरकत पत्राबाबत (एनओसी) तक्रारीवरून तयार झालेली ही फाईल गहाळ झाली आहे.

या प्रकरणी नगररचना विभागाच्या सहाय्यक संचालक स्नेहल यादव यांनी फिर्याद दिली आहे. शाकीर शेख यांनी केलेल्या तक्रारीनुसार, सय्यद फैय्याज यांनी बांधकाम परवानगीसाठी बनावट एनओसी सादर केल्याचा आरोप आहे. तत्कालीन अतिरिक्त आयुक्त डॉ. प्रदीप पठारे यांनी चौकशी करून अहवाल तयार केला होता.

हा अहवाल असलेली मूळ फाईल २१ एप्रिल २०२३ रोजी आयुक्त कार्यालयातून नगररचना विभागाकडे पाठवण्यात आली होती. मात्र, ता. ८ जुलै २०२४ रोजी ही फाईल गहाळ झाल्याचे उघड झाले. गहाळ झाल्याबाबत पोलिस अधीक्षक कार्यालयात तक्रार दाखल करण्यात आली होती.

या फाईलच्या चोरीमागे आर्थिक फायदा किंवा मूळ गुन्ह्यातून स्वतःचा बचाव करण्याचा हेतू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून, उपनिरीक्षक योगेश चाहेर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. या प्रकरणाने महापालिकेतील प्रशासकीय कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

# कापूस आयात शुल्कमाफी विरोधात किसान सभेची निदर्शने; अधिसूचनेची होळी

**अहमदनगर । रयत समाचार**

केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्कमाफीचा कालावधी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्याचा घेतलेल्या निर्णयाविरोधात किसान सभेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अधिसूचनेच्या प्रतीची होळी करून निदर्शने करण्यात आली. या निर्णयामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणार असल्याचा आरोप करत घोषणाबाजी करण्यात आली. बुधवारी (दि. ३ सप्टेंबर) झालेल्या या आंदोलनात राज्य उपाध्यक्ष कॉ. बन्सी सातपुते, कॉ. अ‍ॅड. सुधीर टोकेकर, कॉ. बाबा आरगडे, सचिव कॉ. अप्पासाहेब वाबळे, प्रा. सुभाष ठुबे, कॉ. स्मिता पानसरे, प्रा. सुभाष कडलग, कॉ. अनंत लोखंडे, भारत आरगडे, सुलाबाई आदमाने, नारायण मेमाणे, प्रताप सहाणे, दशरथ हासे, सतीश पवार, सुनील दुधाडे, धोंडीभाऊ सातपुते, मच्छिंद्र आर्ले आदी सहभागी झाले होते. किसान सभेच्या नेत्यांनी सांगितले की, कापूस उत्पादक पट्ट्यातील शेतकरी विरोध करत असतानाही अर्थ मंत्रालयाने शुल्कमाफी वाढवली आहे. या निर्णयामुळे ऑक्टोबर




२०२५ पासून सुरू होणाऱ्या कापूस हंगामात आयात कापसामुळे देशांतर्गत दर घसरतील आणि शेतकऱ्यांना योग्य दर मिळणार नाही. गेल्या ११ वर्षांत कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सीसीआय) ने देशांतर्गत उत्पादनातील केवळ १३ टक्के खरेदी केली असून, उर्वरित ८७ टक्के शेतकरी खुले बाजारात तोट्यात कापूस विकण्यास मजबूर झाले आहेत. मोदी सरकार अमेरिकेच्या दबावाखाली काम करत असून, औद्योगिक मक्तेदार घराण्यांच्या फायद्यासाठी शेतकऱ्यांचे नुकसान करत असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. किसान सभेच्या अहवालानुसार, २०२४ मध्ये भारतातील कापड उद्योगाचा आकार तब्बल १५,१३,८५० कोटी रुपये होता. त्यातील १२,३४,४०० कोटी रुपयांचा हिस्सा देशांतर्गत बाजाराचा होता, तर निर्यात बाजार फक्त ३,२१,९०० कोटी रुपयांचा होता. त्यातही अमेरिकेला जाणारी निर्यात केवळ २०,९८४ कोटी रुपये (१.५% पेक्षा कमी) इतकी असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे निर्यात संकट हा केवळ बहाणा असून, मक्तेदार व्यापाऱ्यांना स्वस्त आयात करून लाभ मिळवून देणे हा खरा हेतू असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. शेतकऱ्यांना फायदेशीर किमान आधारभूत किंमत (एमएसपी) सी२+५०% प्रमाणे न दिल्याने देशातील तब्बल ६० लाख कापूस शेतकऱ्यांचे सुमारे १८,८५० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. शेतकऱ्यांना एमएसपी आणि कामगारांना किमान वेतन हमी दिल्यास देशांतर्गत क्रयशक्ती वाढेल आणि त्यामुळे निर्यात संकटावर मात करता येईल, असे किसान सभेच्या नेत्यांनी नमूद केले. तसेच हातमाग, यंत्रमाग व उद्योगांना स्वस्त कापूस पुरवून देशांतर्गत व्यापार वाढविण्याची गरज आहे. केंद्र सरकारने घेतलेला कापसावरील आयात शुल्कमाफी वाढविण्याचा निर्णय मागे घ्यावा, अशी ठाम मागणी किसान सभेच्या वतीने करण्यात आली असून या निर्णयाविरोधात देशव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टांत नमूद केलेली मिळकत **मौजे केडगांव, ता. जि. अहिल्यानगर** येथील समतानगर भागातील, बिगरशेती प्लॉट मिळकतीचे विद्यमान मालक **(१) श्री. हितेश कांतीलाल पटेल, (२) श्री. रवि मुळजी पटेल,** रा. पटेलवाडी, स्वस्तिक चौक, अहिल्यानगर यांचे मालकीची असून ती त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. सदर मिळकत विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना खरेदी देणेची बोलणी केलेली आहे व रक्कम स्विकारलेला आहे. सदर मिळकत निर्वेध व निर्जोखमी अशी आहे. अशी खात्री व भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरीही सदर मिळकतीबाबत कोणाचेही खरेदीखत, साठेखत, गहान, दान, बक्षीसपत्र कर्जे, बोजा, लिज, लिन, वारसाहक्क, कोर्टमनाई हुकूम अव्वल जप्ती, कोर्ट कार्यवाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, इजमेंटरी राईट, तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाले पासून **७ दिवसाचे आत** योग्य त्या कागदोपत्री पुराव्या सह खालील पत्यावर समक्ष आणुन द्यावी व पोहच घ्यावी मुदतीत कोणाचीही काही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्जोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

डि।। अहिल्यानगर सब डि ।। ता. अहिल्यानगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील तसेच मे. दुय्यम निबंधक, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील **मौजे केडगांव येथील स.नं. १७८ / १** मधील प्लॉट मिळकती पुढीलप्रमाणे-

| प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ८ | ८५.५० | स.नं.१७८/२ | प्लॉ.नं.७ | ९मी रुंद रस्ता | प्लॉ.नं.९ |
| ९ | ८५.५० | स.नं.१७८/२ | प्लॉ.नं.८ | ९मी रुंद रस्ता | प्लॉ.नं.१० |
| १० | ८५.५० | स.नं.१७८/२ | प्लॉ.नं.९ | ९मी रुंद रस्ता | प्लॉ.नं.११ |

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक मिळकती वागणुकीच्या व वहीवाटीच्या हक्कासहीत तदंगभुत वस्तुसह काहीएक राखून न ठेविता.

दिनांक : ०२/०९/२०२५

**ॲड. प्रदिप वसंतराव कर्डीले**

पत्ता - आनंद हाईटस, कोर्ट गल्ली,

जुने जिल्हा न्यायालयासमोर, अहिल्यानगर, मो.नं. ९८२३६७८९०९

# बाळासाहेब देशमुख यांचे कथाकथन; 'मंतरलेला वाडा' व 'अबोली' कथांना टाळ्यांचा कडकडाट




**अहमदनगर । रयत समाचार**

सावेडी भागातील संचारनगर गणेशोत्सव मंडळात आयोजित विविध सांस्कृतिक उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर रविवारी ता.३१ ऑगस्ट रोजी कथालेखक बाळासाहेब देशमुख यांचे कथाकथन रंगतदार पद्धतीने पार पडले. मंडळाचे अध्यक्ष डी. आर. भालेराव अध्यक्षस्थानी होते.

देशमुख यांनी प्रेक्षकांसमोर 'मंतरलेला वाडा' आणि 'अबोली' या कथा सादर केल्या. 'मंतरलेल्या वाडा' या कथेत विसाजी विसपुते गावोगावी कीर्तन करत असताना मराठवाड्यातील वटनवाडी गावात गेलेली गोष्ट कथन करण्यात आली. गावातील काही खट्याळ मुलांनी दाखविलेला इनामदाराचा जुना वाडा, त्यात घडणाऱ्या रहस्यमय घटनांचे चित्रण, बाळासाहेबांनी आपल्या देहबोली, हावभाव, आवाजातील चढउतार आणि स्पष्ट उच्चारातून साकारले. कथानकाच्या उत्कंठावर्धक मांडणीला प्रेक्षकांची दाद मिळाली.

'अबोली' या कथेत आजी-आजोबा आणि नातवंडांच्या नात्याची जिव्हाळ्याची गुंफण उलगडली. ''मातीचा सुगंध अत्तरात का मिळत नाही?'' या निष्पाप बालप्रश्नाने उपस्थितांना निशब्द केले. या भावस्पर्शी प्रसंगाचे उत्कृष्ट सादरीकरण देशमुख यांनी अभिनयातून केले. कार्यक्रमात पाहुण्यांचा परिचय व मंडळाच्या विविध उपक्रमांचा आढावा अध्यक्ष डी. आर. भालेराव यांनी दिला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आशिष सकट, संजय खेले, अमित इंगळे, पालवे सर, विक्रांत कंगे, पांडुरंग ढवळे, हनुमंतराव गोपाळघरे यांनी परिश्रम घेतले. यावेळी विश्वनाथ वाघ व सुनील डोंगरे कुटुंबीयांच्या शुभहस्ते गणरायाची आरती संपन्न झाली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन राजेश थोरात यांनी केले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# मराठा आरक्षणाला यश; शहरात जल्लोष

**शेवगाव । रयत समाचार**

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईतील आझाद मैदानावर संघर्षयोध्दा मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या उपोषणाला अखेर यश मिळाले. राज्य सरकारच्या उपसमितीने जरांगे यांच्या सात मागण्यांपैकी पाच मागण्या मान्य करताच उपोषण मागे घेण्यात आले. या ऐतिहासिक विजयाचा आनंद शेवगाव शहरात फटाके, गुलाल आणि डीजेच्या तालावर जल्लोषात साजरा करण्यात आला. गेल्या पाच दिवसांपासून जरांगे उपोषणाला बसले होते. आंदोलकांवर मर्यादा आणण्याचा प्रयत्न झाला तरी गावागावातून रसद पोहोचत असल्याने आंदोलन ठामपणे सुरू राहिले. यामुळे राज्य शासनावर दबाव वाढला. शेवटी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, यांच्यासह समितीच्या चर्चेनंतर आज शासन निर्णय (जीआर) सादर करून मागण्या मान्य करण्यात आल्या. त्यानंतर जरांगे यांनी आंदोलनकर्त्यांच्या उपस्थितीत लिंबू सरबत पिऊन उपोषण मागे घेतले. आरक्षणाचा लढा जिंकल्याचा आनंद शेवगावमध्येही उफाळून आला. शहरातील क्रांती चौकात सकल मराठा समाजाच्या वतीने डीजेच्या गजरात, गुलालाच्या उधळणीत आणि फटाक्यांच्या आतषबाजीत मोठ्या उत्साहात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष विजय देशमुख, दिनेश लव्हाट, सुरेश लांडे, शरद जोशी, निलेश बोरुडे, नितीन सातपुते, चंद्रकांत लबडे, दीपक शेडे, शितलकुमार पुरनाळे, सिद्धार्थ काटे, योगेश बोडखे, विजय पवार, महेश फलके, संतोष भुसारी, अजिंक्य लांडे, वैभव पवार, किशोर पवार, अविनाश देशमुख, शंकर लांडे, काकासाहेब घुले आदींसह शेकडो युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.





# ओबीसी व भटक्या विमुक्तांचे आरक्षण बचावासाठी आमरण उपोषण

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

ओबीसी व भटक्या विमुक्तांचे आरक्षण बचावण्यासाठी श्रीगोंद्या तालुक्यातील ओबीसी व भटक्या विमुक्त बांधव आज तहसील कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषण करणार असल्याचे निवेदन साहेबराव रासकर, मुकुंद सोनटक्के, शिवाजी राऊत व अन्य ओबीसी व भटक्या विमुक्त बांधव यांनी तहसीलदार तसेच पोलीस निरीक्षक श्रीगोंदा यांच्याकडे दिले. निवेदनात म्हटले आहे की, मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री यांनी ओबीसी आरक्षणाला धोका न निर्माण करता मराठ्यांना आरक्षणाची व्याख्या स्पष्ट करावी, बोगस कुणबी प्रमाणात घेऊन घुसखोरी करणाऱ्यांची नोंद रद्द करावी आणि ओबीसी आरक्षणाबाबत आपली भूमिका स्पष्ट करणारी श्वेतपत्रिका जाहीर करावी. तसेच, धनगर समाजाबाबत अपशब्द वापरणाऱ्या मनोज जरांगे यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करावी. आमच्या या मागण्यांना त्वरित प्रतिसाद न दिल्यास, ता. ३ सप्टेंबर २०२५ रोजी साहेबराव रासकर, मुकुंद सोनटक्के आणि शिवाजी राऊत तहसील कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषण करणार आहेत. त्याचबरोबर ओबीसी बांधव साखळी उपोषणात सहभागी राहणार असून, होणाऱ्या परिणामांची जबाबदारी शासनावर असेल, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.



# वाणिज्य क्षेत्रात करिअरच्या संधी- सार्थक मार्ले

**पाथर्डी । रयत समाचार**

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडिया आणि बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालय, पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कर क्षेत्रातील संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात चार्टर्ड अकाउंटंट गौतमी खाटेर आणि अहिल्यानगर येथील चार्टर्ड अकाउंटंट सार्थक मार्ले चा यांनी भारतीय कर प्रणाली, गुड्स अँड सर्विस टॅक्स, कस्टम, एक्साईज आणि इतर प्रकारच्या कर प्रणालीबाबत माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना वाणिज्य आणि बँकिंग क्षेत्रात करिअरच्या भरपूर संधी असल्याचे सांगितले आणि या क्षेत्राचा विचार करण्यासाठी प्रोत्साहित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.ए. चौरे होते. तर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. सलीम शेख उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. महारुद्र घुले यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. मन्सूर शेख यांनी केले, तर आभार प्रा. अनिल नारखेडे यांनी मानले.

# केदारेश्वर सहकारी साखर कारखाना आर्थिक गैरव्यवहारामुळे ऊस उत्पादक त्रस्त

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा आंदोलनाचा इशारा

**शेवगाव । रयत समाचार**

केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या आर्थिक गैरव्यवहारामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हक्काचे पैसे मिळालेले नाहीत. साखरेची विक्री करूनही कारखान्याकडून देयके गायब झाल्याच्या आरोपामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यापूर्वी तहसीलदार कार्यालय व पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत अनेक बैठका घेण्यात आल्या. मात्र कारखाना व्यवस्थापनाकडून वेळोवेळी टाळाटाळ करून शेतकऱ्यांना पैसे देण्यात आले नाहीत. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या दबावामुळे

**वारंवार दिल्या जाणाऱ्या तारखांमुळे शेतकरी वर्गामध्ये संताप वाढला आहे. ''तारीख पे तारीख देऊन शेतकऱ्यांची थट्टा करू नये; त्वरित पैसे द्यावेत'' अशी ठाम मागणी संघटनेच्या नेत्यांनी केली.**

अखेर कारखान्याच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी १२ सप्टेंबर २०२५ पर्यंत शेतकऱ्यांचे पैसे वर्ग करण्याची हमी तहसीलदारांना दिली आहे. प्रशासनानेही कारखाना प्रतिनिधींना स्पष्ट शब्दांत सांगितले की, ही शेवटची संधी आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे दत्तात्रय फुंदे,



रावसाहेब लवांडे, बाळासाहेब फटांगडे, मच्छिंद्र आरले, अशोक भोसले, मेजर अमोल देवढे, प्रशांत भराट, नारायण पायघन, दादासाहेब पाचरणे, हरिभाऊ कबड्डी, विकास साबळे, अंबादास भागवत, मच्छिंद्र डाके आदी पदाधिकारी व ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे की, शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये; अन्यथा आंदोलन उभारण्यासोबतच हा प्रश्न न्यायालयात खेचून कायदेशीर लढा दिला जाईल.

# सद्भावना आनंद सेवा मंडळ मानाच्या गणपतीची पत्रकारांच्या हस्ते आरती

**श्रीगोंदा । रयत समाचार**

श्रीगोंदा शहरातील सदभावना आनंद सेवा मंडळाच्या मानाचा गणपतीची मंगळवार, ता. २ सप्टेंबर रोजी रात्री आरती पत्रकार अमिनभाई शेख, बाळासाहेब काकडे, माधव बनसुडे व जेष्ठ पत्रकार रमेश गांधी यांच्या हस्ते करण्यात आली.



मानाचा गणपती म्हणून ख्याती असलेल्या गणपतीवर नागरिकांची विशेष श्रद्धा आहे. गल्लीतील तीन मुस्लिम कुटुंब अनेक वर्षांपासून नवस कृतीसाठी पेढे व नारळ ठेवतात. यावेळी पत्रकारांनी मंडळाच्या सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. आरती कार्यक्रमास मंडळाचे अध्यक्ष संतोष क्षीरसागर, कार्याध्यक्ष महावीर पटवा, जेष्ठ सदस्य रसिकशेठ कटारिया, आनंद कटारिया, आनंद गांधी, खजिनदार दयानंद लोखंडे, गौतम पटवा, महेश अंबिलवादे, दीपक दळवी, अतुल मेहता, जय पलिवाल, सौरभ गुंदेच्या, लादेश कटारिया, गणेश क्षीरसागर, चंद्रकांत धोत्रे यासह मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

# गणेशोत्सवानिमित्त रक्तदान शिबिर; महारुद्र प्रतिष्ठानचा उपक्रम

**नगर तालुका । रयत समाचार**

नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथे रविवार, ता. ३१ ऑगस्ट रोजी महारुद्र प्रतिष्ठानच्या गणेशोत्सवानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित केले गेले. शिबिराचे उद्घाटन शुभम बोरा यांच्या हस्ते करण्यात आले. महारुद्र प्रतिष्ठान मागील पाच वर्षांपासून नियमितपणे रक्तदान शिबिराचे आयोजन करत सामाजिक बांधिलकी



जपत आहे. कोरोना काळातही प्रतिष्ठानने गावात मोफत फवारणी व सॅनिटायझर वाटप केले होते. या शिबिरात गावातील ५० युवकांनी रक्तदान केले. शिबिरासाठी अहिल्यानगरीतील न्यू अर्पण ब्लड बँकेचे सहकार्य लाभले. तसेच प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष अनिकेत ठाणगे, मनोज गुंड, सत्यम बोरा, ओंकार झिने, साई काळे, ओंकार रायकर, अभिषेक ठाणगे व निखिल ठाणगे यांनीही शिबिर यशस्वी करण्यासाठी महत्वपूर्ण सहकार्य केले.



# मुख्याध्यापक बेल्हेकर यांच्या संकल्पनेतून पर्यावरणपूरक गणेश विसर्जन

**नेवासा । विजय खंडागळे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक विद्यालय, मुळा कारखाना येथे आज पर्यावरणपूरक पद्धतीने गणेश विसर्जन करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक व्यंकटेश बेल्हेकर यांच्या हस्ते गणरायाची आरती करून आनंदमय वातावरणात बाप्पाला निरोप देण्यात आला. इयत्ता नववीचे वर्गशिक्षक शिंदे आर. एस. यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शालेय मैदानावर फुलांनी सजवलेले पात्र तयार करून विसर्जनाचे नियोजन केले. विद्यार्थ्यांनी रांगोळी काढून परिसराची आकर्षक सजावट केली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना आपल्या घरच्या गणपतीचे विसर्जनही पर्यावरणपूरक पद्धतीने करण्याचे मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमासाठी क्रीडा शिक्षक आप्पासाहेब शेटे यांनी विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था व शिस्तबद्ध नियोजन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक मुंगसे, गाडेकर, गवळी, पटारे यांनी परिश्रम घेतले.

# शुक्रवारी ५ सप्टेंबरला ईद- ए- मिलाद; मूहे मुबारक, जुलूस भंडाऱ्याचे आयोजन

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती अर्थात ईद-ए-मिलादचा सण शुक्रवारी ता.५ सप्टेंबर रोजी शहरात आणि तालुक्यात साजरा केला जाणार आहे. त्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध भागात जयंतीची जय्यत तयारी करण्यात आली. विविध सामाजिक संस्था व मित्रमंडळांनी आपापला परिसर विद्युत रोषणाईने सजविला. शहराचा मुस्लिमबहुल भाग असलेल्या वॉर्ड २ मधील सय्यद बाबा दर्गाह परिसर, वेस्टर्न चौक, मौलाना आझाद चौक, फतेह चौक, काजीबाबा दर्गाह परिसर, सुलतान नगर, प्रांत कार्यालयामागील हुसेननगर, कुरेशी मोहल्ला, गुलशन चौक, मिल्लतनगर, फातेमा हाऊसिंग



सोसायटी, गोंधवणी रोड अशा विविध भागात ठिकठिकाणी घरांवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. हिरवे झेंडे, पताका लावून परिसर सुशोभित करण्यावर समाज बांधवांकडून भर दिला जात आहे. मशिदींवर ठिकठिकाणी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण आहे. इस्लामी कालगणनेतील 'रबीऊल अव्वल' या उर्दू महिन्याच्या १२ तारखेला पैगंबर जयंती साजरी केली जाते. श्रीरामपूर शहरातही पैगंबर जयंतीनिमित्त जुलूसचे आयोजन करण्यात आले. जामा मशीद मौलाना आझाद चौकापासून सकाळी ८ वाजता हा जुलूस निघणार आहे. शहरातील प्रमुख मार्गांवरून तो पुन्हा जामा मशीदीत १२ वाजेपर्यंत येणार आहे. कार्यक्रम आटोपल्यानंतर भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी शुक्रवारच्या नमाजनंतर मुहे मुबारक दाखविला जाणार आहे, अशी माहिती मौलाना इमदाद अली यांच्यासह जामा मशिदीच्या विश्वस्तांनी दिली. बेलापुर पंचक्रोशीतही पैगंबर जयंतीनिमित्त मुस्लीम बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, समाजबांधवांनी काही ठिकाणी आपली घरे, दुकाने व परिसर रोषणाईने सजविली आहेत. सामाजिक संस्था आणि लोकप्रतिनिधींकडून व्हॉट्सअपवर शुभेच्छा पोस्टर पोस्ट केले गेले आहेत. ईद-ए-मिलादनिमित्त श्रीरामपूर शहर आणि बेलापुर, एकलहरे, टिळकनगर, पढेगाव, टाकळीभान अशा ठिकाणी सजावटीच्या कामाला वेग आला आहे. यासाठी लागणारे विविध प्रकारचे आकर्षक हिरवे झेंडे, पताका, विद्युत माळा आदी सजावटीच्या साहित्याने शहरातील दुकाने गजबजली आहेत. बालकांमध्येही हा उत्साह दिसून येत आहे. ईद-ए-मिलादुन्नबीनिमित्त पारंपारिक मार्गावर स्वागत कमानी उभारण्यात आल्या आहेत.

# अमेरिकेला शह देण्यासाठी चीन, रशिया, भारत महायुती



चीनच्या शांघाय शहरात नुकतीच एक आंतरराष्ट्रीय शिखर परिषद पार पडली. या शिखर परिषदेत अनेक राष्ट्रांचे प्रमुख उपस्थित होते मात्र सर्वांचे लक्ष होते ते जिनिपिंग, पुतिन आणि मोदी या चीन, रशिया आणि भारत या देशांच्या राष्ट्र प्रमुखांकडे. जिनिपिंग, पुतिन आणि मोदी हे तीन नेतेच या शिखर परिषदेत केंद्रस्थानी होते त्याचे कारणही तसेच होते अमेरिकेने भारत आणि चीनवर टाकलेल्या टॅरीफ बॉम्ब नंतर होणारी ही पहिलीच शिखर परिषद होती. चीन आणि भारतावर टाकलेल्या टॅरीफ बॉम्बमुळे चीन आणि भारताचे अमेरिकेशी असलेले संबंध बिघडले आहेत तर रशियाने युक्रेनशी सुरू असलेले युद्ध थांबवावे यासाठी पुतिन आणि ट्रम्प यांच्यात झालेली बैठक फिस्कटली त्यामुळे या दोन्ही देशात देखील तणाव निर्माण झाला त्या पार्श्वभूमीवर ही शिखर परिषद खूप महत्वाची मानली जात होती. अमेरिकेला शह देण्यासाठी ही परिषद आयोजित केली असे मानले जात होते त्यामुळे या शिखर परिषदेतून अमेरिकेला कोणता इशारा दिला जाईल याकडे जगाचे लक्ष लागले होते तसा इशारा या शिखर परिषदेतून अमेरिकेला दिलाही गेला. भारत, चीन आणि रशिया हे तिन्ही देश एकत्र आल्याचे या निमित्ताने जगाने पाहिले. भारत आणि रशिया यांची मैत्री तर जगजाहीर आहे आता भारत आणि चीन यांचे देखील संबंध सुधारत आहे. जर हे तीन देश एकत्र आले तर अमेरिकेला शह देतील असा इशारा या निमित्ताने दिला गेला आणि तो अमेरिकेपर्यंत पोहचला देखील म्हणूनच या शिखर परिषदेनंतर अमेरिकेने भारतावर टीका केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड टीम यांचे व्यापार विषयक सल्लागार आणि भारताचे विरोधक असलेले पीटर नवारो यांनी शांघाय सहकार्य परिषदेच्या निमित्ताने मोदी, पुतिन आणि जिनिपिंग यांची झालेली भेट त्रासदायक असल्याचे म्हंटले आहे. भारताने चीन आणि रशिया सोबत नव्हे तर अमेरिका, युक्रेन आणि युरोप सोबत असायला हवे असे त्यांनी म्हटले आहे. पीटर नवारो यांच्या या वक्तव्यातून भारताने रशिया आणि चीनशी केलेली युती अमेरिकेच्या मर्मावर बोट ठेवणारी ठरली हे स्पष्ट झाले. नवारो यांच्या या वक्तव्यातून शांघाय शिखर परिषदेचा हेतू सफल झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भारत, चीन आणि रशिया हा त्रिकोण तयार झाल्यास अमेरिकेलाच त्याचा सर्वाधिक त्रास होईल असे जाणकारांनी याआधीच सांगितले आहे. संयुक्त राष्ट्रातील अमेरिकेच्या माजी राजदूत असलेल्या निकी हॅले यांनी आधीच असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांना दिला होता तो खरा ठरताना दिसत आहे. आज भारत, रशिया आणि चीन एकत्र येत आहे त्याचा अमेरिकेला पोटशूळ झाला आहे पण याला तेच जबाबदार आहेत. डोनाल्ड ट्रम्प हे आपल्या हेकेखोर स्वभावामुळे अमेरिकेलाच अडचणीत आणत आहे काही कारण नसताना ट्रम्प यांनी भारत आणि चीनवर भरमसाठ टॅरीफ लावले. भारत आणि चीनने विनंती करूनही ट्रम्प यांनी ते कमी केले नाही. त्यांना वाटले भारतावर टॅरीफ लावल्याने भारत झुकेल आणि ट्रम्प सांगेल तसे वागेल. कोणाचे कोणावाचून अडत नाही, प्रत्येक गोष्टीला पर्याय असतो हे ते विसरले. भारताने पर्याय शोधला आणि मग अमेरिकेला जाग आली. आता नवारो म्हणतात मोदींबद्दल माझ्या मनात खूप आदर आहे. मला भारतीय लोक खूप आवडतात. आज मोदी आवडतात म्हणणारे नवारो काही दिवसांपूर्वी मोदी आणि भारतावर टीका करत होते. वास्तविक भारताने अमेरिकेला कायम मित्र मानले. पंतप्रधान मोदी तर ट्रम्प यांना जाहीरपणे माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असे म्हणत असे पण डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या हेकेखोर स्वभावामुळे भारतासारखा मित्र गमावला. केवळ भारतच नाही तर भारतासारख्या अनेक देशांवर टॅरीफ लावून अमेरिकेने दुखावले आहे. भविष्यात ते देखील अमेरिके विरुद्ध एकत्र आले तर आश्चर्य वाटायला नको. ट्रम्प यांच्या या आतातताई भूमिकेचा अमेरिकेचे नागरिकही निषेध करत आहे. एकदा नव्हे तर दोनदा ट्रम्प यांच्या धोरणाविरुद्ध अमेरिकन नागरिक रस्त्यांवर उतरले होते मात्र त्यातूनही ट्रम्प यांनी काही धडा घेतला नाही. त्यांच्या आतातताई धोरणामुळे चीन, रशिया, भारत असा नवा त्रिकोण तयार झाला. हा त्रिकोण जर मजबूत झाला तर भविष्यात अमेरिकेला नक्कीच शह देईल यात शंका नाही.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**


# उद्या ईद-ए-मिलादची मिरवणूक

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांचा जन्मदिन ईद-ए-मिलाद म्हणून जगभरात साजरा केला जातो. या निमित्ताने उद्या शुक्रवारी, ता. ३ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता ईद-ए-मिलादुन्नबीची मिरवणूक जामा मशिदीच्या प्रांगणातून काढण्यात येणार असल्याची माहिती जामा मशिदीचे खतीब व इमाम हजरत मौलाना मोहम्मद इमदादअली यांनी दिली. सालाबादप्रमाणे यावर्षीही मिरवणूक सकाळी निघाल्यानंतर वॉर्ड क्रमांक दोन, मिल्लत नगर, फातिमा कॉलनी व नेहमीच्या परंपरागत मार्गावरून पुन्हा जामा मशिदीत दाखल होईल. तेथे मिरवणुकीची सांगता होईल. त्यानंतर शुक्रवारची साप्ताहिक नमाज होणार असून, जुमा नमाजानंतर हजरत पैगंबरांच्या पवित्र केसाचे दर्शन करविण्यात येईल. त्याच वेळी जामा मशिदीच्या हॉलमध्ये महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमांना सर्व मुस्लिम बांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जामा मशीद ट्रस्ट व शहरातील सर्व मशिदींचे ट्रस्ट यांच्या वतीने करण्यात आले आहे. पैगंबर जयंतीचा उत्सव यशस्वी करण्यासाठी शहरातील अहले सुन्नत वल जमातच्या सर्व मशिदींचे मौलाना, प्रमुख कार्यकर्ते व विविध तरुण मंडळे प्रयत्नशील आहेत. त्यामुळे पैगंबर जयंतीची मिरवणूक व इतर धार्मिक कार्यक्रमांमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मौलाना मोहम्मद इमदादअली तसेच शहरातील सर्व मशिदींचे प्रमुख धर्मगुरूंनी केले आहे.

# ‘विठ्ठल हे जन, विठ्ठल हे मन’ नाथ पै मंडळाचा हरिनामाचा गजर

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**



पंढरपूरचा ‘‘पांडुरंग’’ हा महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, गोवा आदी राज्यांसह लाखो हरिभक्तांचे आराध्य दैवत. अवघ्या जनांचे भावविश्व फलवणारा आणि विश्वात्मक भाव जागवणारा हा साधा भोळा देव भलताच लोकविलक्षण. म्हणूनच ‘‘विठ्ठल हे जन... विठ्ठल हे मन’’ असे समीकरण झाले असून, त्याची प्रचिती बॅ. नाथ पै चौक मंडळाच्या श्रींच्या मंडपात मंगळवारी सायंकाळी अनुभवायला मिळाली. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त नाथ पै चौक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने संगीता स्वीट्सच्या सहकार्याने विविध सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक उपक्रम हाती घेतले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून वडगाव येथील श्री ज्ञानेश्वर भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम मंगळवारी सायंकाळी आयोजित करण्यात आला होता. गेली हजार वर्षांहून अधिक काळ विठ्ठलनामाने व विठ्ठलनादाने मराठी मनांचे भरणपोषण होत आहे. संतांनी दिलेल्या शिकवणीमुळे या मातीत छत्रपती शिवाजी महाराजांसारखे राष्ट्रपुरुष जन्माला आले. वारकरी संप्रदायाची भगवी पताका धर्मध्वज बनली आहे. कटीकर ठेवून उभा असलेला हा नि:शस्त्र, निरागस देव आजवर सर्वांना जगण्याचे आणि लढण्याचे बळ देत आला आहे. ज्ञानेश्वर भजनी मंडळाने सादर केलेल्या अभंगातून हरिनामाचा गजर घुमला. दोन तासांच्या या कार्यक्रमात श्रींच्या मंडपात भक्तिभावाने वातावरण हरिमय बनले. या प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील यांच्या हस्ते भजनी मंडळाचे ज्येष्ठ ह. भ. प. कृष्णा खन्नुकर यांचा शाल, स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. अन्य वारकऱ्यांचाही मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच सोमवंशी क्षत्रिय समाजातील ज्येष्ठ व्यक्ती राजू कटारे, सुधीर जरतारकर, सुनील शिराळकर, किशोर शिराळकर, सुनील चौधरी, सचिन रंगरेज, विठ्ठल चौधरी, सचिन चौधरी, कृष्णा चौधरी, मनोहर जरतारकर यांचा तसेच महिला मंडळातील शोभा जरतारकर, तेजश्री जरतारकर, मनीषा झाड, मंजुळा जितूरी, अनुराधा रायबागी, नंदा शिराळकर, हिरा चौधरी, मंजू रामनिंग यांचाही मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# किशोर नवले यांची सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड

**बेलापूर । शफीक बागवान**



बेलापूर बु. येथील सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी किशोर शंकरराव नवले यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेचे चेअरमन विलास मेहेत्रे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाल्यानंतर रिक्त झालेल्या पदावर ही निवड पार पडली. निवडणूक अधिकारी रवींद्र जाधव व सचिव विजय खंडागळे यांच्या देखरेखीखाली झालेल्या या निवडणुकीत संचालक व सभासदांनी एकमुखाने नवले यांच्यावर विश्वास दाखवला. बैठकीस माजी चेअरमन व श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर पा. नवले, जनता आघाडीचे अध्यक्ष रवींद्र खटोड, ज्येष्ठ संचालक अरुण पा. नाईक, माजी सरपंच भरत साळुंके, विद्यमान उपाध्यक्ष अन्तोन अमोलिक यांच्यासह संचालक मंडळातील व सभासदांचे मोठ्या संख्येने उपस्थिती होती. नवीन चेअरमन म्हणून निवड झाल्यानंतर किशोर नवले यांनी विश्वास दाखविलेल्या सर्व संचालक व सभासदांचे आभार मानले व संस्थेच्या प्रगतीसाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील पांढरकर व राहींज सेट परीक्षा उत्तीर्ण

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**





सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील गणेश पांढरकर व पायल राहींज यांनी रसायनशास्त्र विषयाची परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली आहे. यामुळे ते सहाय्यक प्राध्यापक पदासाठी पात्र ठरले आहेत. परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

या यशामध्ये रसायनशास्त्र विभाग प्रमुख उपप्राचार्य डॉ. नितीन थोरात, डॉ. किरण ढवळे, प्रा. भाऊसाहेब बुलाखे, प्रा. स्वाती नलगे व विभागातील सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. महादेव जरे, उपप्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश साळवे आणि उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ यांनीही गणेश पांढरकर व पायल राहींज यांचे अभिनंदन केले.

# कॉम्रेड उर्मिला घागरे यांचे निधन


**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

अभ्युदयनगरचे माजी लोकप्रिय नगरसेवक कॉम्रेड नारायण घागरे यांच्या पत्नी कॉम्रेड उर्मिला नारायण घागरे या दीर्घ आजाराने ता. २ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजता अखेरच्या विश्रांतीस गेल्या. त्यांच्या निधनामुळे कुटुंब, मित्रपरिवार आणि अभ्युदय नगर वसाहतीमध्ये दु:खाचे वातावरण पसरले आहे.

कॉम्रेड उर्मिला घागरे यांनी सदैव समाजसेवा आणि लोककल्याणाला प्राधान्य दिले. त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या चिन्हावर नगरसेवक पदासाठी निवडणूक लढवली आणि सातत्याने सामाजिक उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या कार्यामुळे अनेकांना प्रेरणा मिळाली आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्यास त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांचे अंत्यसंस्कार भोईवाडा स्मशानभूमी येथे झाले. समाजातील मित्रपरिवार, सहकारी आणि अनुयायी या वेदनादायक प्रसंगात त्यांच्या परिवारासोबत आहेत. कॉम्रेड उर्मिला नारायण घागरे यांचे निधन फक्त कुटुंबासाठीच नव्हे, तर अभ्युदय नगर वसाहतीसाठीही असंख्य क्षणांचा कधीही भरून न येणारा तोटा आहे. त्यांच्या स्मरणाने आणि कार्याने पुढील पिढ्यांमध्ये समाजसेवेची ज्वाला कायम राहील, हीच भावना या वेदनादायक प्रसंगी व्यक्त केली जात आहे.

# ‘लेखकाचे घर’ ग्रंथाचे ९ सप्टेंबरला कुमार केतकर यांच्या हस्ते प्रकाशन

**मुंबई । रयत समाचार**




लेखकाच्या सर्जनशीलतेचा, त्याच्या अस्वस्थतेचा आणि कल्लोळाचा नि:शब्द साक्षीदार असणाऱ्या घराच्या भिंतींवर भाष्य करणारे ऊर्मिला चाकूरकर लिखित ‘लेखकाचे घर’ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मंगळवारी ता. ९ सप्टेंबर २०२५ रोजी सायं. ६.०० वा. भूपेश गुप्ता भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ लेखक, पत्रकार आणि विचारवंत कुमार केतकर यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉ. डॉ. भालचंद्र कानगो राहणार आहेत. या प्रसंगी अभिनेते, कवी व दास्तानगो अक्षय शिंपी हे पुस्तकातील निवडक अंशांचे अभिवाचन करून वातावरण रंगवणार आहेत. लोकवाङ्मय गृहातर्फे ग्रंथप्रेमी व वाङ्मयप्रेमींना या सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले असून, नवी दिल्लीतील साहित्यिक, कलावंत आणि अभ्यासक यांची उपस्थिती लाभण्याची अपेक्षा आहे. हे पुस्तक लेखकाच्या भावविश्वाचे, त्याच्या लेखनप्रक्रियेतील चढउतारांचे आणि घराशी असलेल्या नात्याचे हळवे चित्रण करणारे असल्याने प्रकाशन सोहळ्याबद्दल साहित्यवर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे.

# शिक्षकांच्या मागण्यांना न्याय देण्यासाठी प्राथमिक शिक्षण विभागाची बैठक

**अहमदनगर । रयत समाचार**



शिक्षक हे शिक्षण व्यवस्थेचा कणा असून तो अधिक सक्षम झाल्यास विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल, या भूमिकेतून अहमदनगर येथे प्राथमिक शिक्षण विभागाची बैठक पार पडली. या बैठकीत शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीत निवड व वरिष्ठ वेतनश्रेणीतील सर्व प्रलंबित प्रस्ताव ता.३० सप्टेंबरपर्यंत निकाली काढण्याचे आदेश देण्यात आले. तसेच २००६ पासून थकीत भत्ते एका महिन्यात निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले. पंचायत समिती स्तरावरील रिक्त पदे तातडीने भरणे, कायमस्वरूपी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर दिव्यांग शिक्षकांना पुन्हा तपासणीसाठी न पाठवणे, तसेच अन्य विभागांकडून शिक्षकांकडून अशैक्षणिक कामे न घेण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठविण्याची सहमती बैठकीत झाली. तसेच उर्दू माध्यम शाळांसाठी मिशन आरंभ पुस्तकांचे भाषांतर, रिक्त विस्तार अधिकाऱ्यांच्या जागी मुख्याध्यापकांना प्रभारीपद देणे, आणि ६ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हास्तरीय पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा सत्कार आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या सर्व निर्णयांची वेळेत अंमलबजावणी करून शिक्षकांच्या समस्या सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, सर्व विभागांचे उपशिक्षणाधिकारी तसेच विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.